# संपत्तीच्या वादातून स्वतःच्या बापाचा खुन करणाऱ्यास भोसरी पोलिसांकडून अटक

प्रेसनोट दिनांक. १८/०६/२०२०

## संपत्तीच्या वादात स्वतःच्या बापाचा खुन करणाऱ्यास भोसरी पोलीसांकडुन अटक

काल दिनांक १७/०६/२०२० रोजी नियंत्रण कक्षाकडुन मिळालेल्या माहितीनुसार भाटीया चाळ, दापोडी येथे भोसरी पोलीस पोहचले. बंद घराचे कुलुप तोडुन पोलीसांनी आत प्रवेश केला असता एका वयस्कर इसमाचा खुन झालेला आढळुन आला. सदर बॉडीचे हातपाय दोरीने बांधुन ठेवलेले होते. घटनास्थळावरुन खुना बद्दल कोणताही सुगावा मिळत नव्हता. मयत हा एकटाच त्या घरात राहत असे, तसेच परिसरातील लोकांच्या संपर्कात नसल्यामुळे मयताबाबत तसेच नातेवाईकांबाबत कोणतीही माहिती मिळत नव्हती. त्यानंतर त्या इसमाचे नाव सुनिल मुतय्या पोलकम, वय ६८ वर्षे असे असल्याचे समजले. घटनेच्या अनुषंगाने तपास सुरु केला असता मयताचा मुलगा दत्ता उर्फ राजेश सुनिल पोलकम, वय ३८ वर्षे, रा. खडकी पुणे याचेवर संशय निर्माण झाला. त्याचा शोध घेण्यासाठी भोसरी तपास पथकाचे दोन टिम तयार करुन वेगवेगळ्या ठिकाणी रवाना केले. आरोपीबाबत नातेवाईकांकडे सखोल तपास केला परंतु गुन्हा केल्यापासुन आरोपी स्वतःच्या घरीही गेला नसल्याचे कळले, तो कोणत्याही नातेवाईकाच्या संपर्कात नव्हता त्यामुळे आरोपीचा शोध लागत नव्हता. तो कोठेतरी पळुन जाण्याच्या तयारीत असल्याबाबत भोसरी तपास पथकाला गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार आरोपीला पकडण्यासाठी सापळा लावुन त्यास शिताफीने ताब्यात घेतले. सुरवातीला तो उडउडवीची उत्तरे देता होता परंतु सखोल तपासअंती आरोपीने गुन्हा केल्याचे कबुल केले. **माझे वडील मला टेम्पो घेण्यासाठी पैसे देत नव्हते तसेच संपत्तीचा कोणताही हिस्सा त्यांनी मला कधीही दिला नाही म्हणुन खुन केल्याचे त्याने कबुल केले.** त्याबाबत भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३०६/२०२० भा.द.वि.कलम ३०२,२०१ अन्वये गुन्हा दाखल केलेला असुन त्यास अटक करण्यात आलेली आहे.

सदर कामगिरी मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री. संदीप बिष्णाई सो., मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे सो., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. रामचंद्र जाधव, सो. पिंपरी विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. शंकर आवताडे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे, पो. कर्मचारी गणेश हिंगे, सुमीत देवकर, समीर रासकर, संतोष महाडीक, आशिष गोपी, अजय डगळे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.


भोसरी पोलीस ठाणे
Vivo V11Pro
AI Dual Camera